वरील दोन्ही लिफाफ्यावर " लिफाफा क्रमांक १ " व " लिफाफा क्रमांक २ " असे ठळक अक्षरात नमूद करावे. नंतर वरील दोन्ही लिफाफे तिसऱ्या मोठया लिफाफ्यात बंद करुन त्यावर निविदे विषयीची माहिती निविदाकाराचे नांव इत्यादी माहिती ठळक अक्षरात नमूद करावी.

१२. निविदेतील शर्तीनुसार निवडण्यात आलेल्या ठेकेदारास निविदेत सुचविलेल्या दराच्या एकूण वार्षिक रकमेच्या ३ टक्के रक्कम प्रतिभूती ठेव म्हणून करारनाम्यासह दर्शनी धनाकर्षाने (Demand Draft) या कार्यालयास सादर करावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१३. ठेकेदारास प्रत्येक दिवशी कार्यालयीन वेळेत साफसफाई कामगारांना हजेरीपट प्रत्यक्ष सादर करावा लागेल. साफसफाईच्या कामात दिरंगाई/गैरवर्तन केल्याचे आढळल्यास व त्याबाबत कार्यालयीन कर्मचाऱ्यांची तक्रार असल्यास ठेकेदारास स्पष्टीकरणाची संधी दिल्यानंतर तक्रार योग्य ठरल्यास प्रत्येक तक्रारीकरिता रुपये ५००/- (रुपये पाचशे मात्र) इतका दंड आकारण्यात येईल. गैरवर्तन/अश्लिल हावभाव किंवा कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी न आढळल्यास त्या प्रमाणात साफसफाईच्या मासिक देयकातून वसुली करण्यात येईल.

१४. ठेकेदारास स्वखर्चाने आवश्यक किंमतीच्या मुद्रांक कागदावर करारनामा करुन दयावा लागेल. ठेकेदारास साफसफाई कामाचा एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्या अनुभवांपृष्ठयर्थ संबंधित संस्थेची प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१५. ठेकेदाराने त्याचे कामगारांना त्यांच्या छायाचित्रासह ओळखपत्र दयावे. ओळखपत्र असलेल्या कामगारांनाच या कार्यालयात साफसफाईच्या कामावर नेमता येईल.

१६. कामावर असतांना कंत्राटदाराच्या कामगारास कोणतीही इजा/जखम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. परिवहन आयुक्त कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१७. साफसफाईचे काम करतांना कार्यालयातील कोणतीही वस्तू हलवितांना काळजीपूर्वक हालचाल करणाच्या सूचना कामगारांना देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. परिवहन आयुक्त कार्यालयातील कागदपत्रांची नासधूस, कार्यालयातील साहित्य, संगणक इ.वस्तूंची तोडफोड अथवा हानी झाल्यास किंवा स्वच्छतेसाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यामुळे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्याची भरपाई करावी लागल्यास मासिक देयक रकमेतून कपात करण्यात येईल.

१८. ठेकेदाराने कराराच्या अटींचा भंग केल्यास ठेकेदाराची अनामत रकम जप्त करण्यात येईल.

१९. ठेकेदारास दरमहा कंत्राटाची रक्कम मागणी करण्यासाठी ३ प्रतीत देयक सादर करावे. सदर बाबत नियंत्रण शाखेने प्रमाणित केल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात येईल.

२०. न्युनतम दर सादर करणा-या अंतिमतः निवडलेल्या ठेकेदाराने या निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे काम करण्यास असमर्थता दर्शविली तर त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल.

अंतर्गत साफसफाई सन २०१३-१४ च्या निविदा परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ येथे **दिनांक १७.०१.२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत स्विकारल्या जातील**. विहित वेळेनंतर निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. निविदा त्याच दिवशी म्हणजे **दिनांक ३०.०१.२०१३ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता** त्यावेळी हजर असणाऱ्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात येतील. निविदांचे वाचन झाल्यावर नमूद केलेल्या दरात कोणतेही फेरफार मान्य केले जाणार नाहीत. तसेच कारण न देता कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार परिवहन आयुक्त, मुंबई यांनी राखून ठेवलेले आहेत.

**परिवहन उप आयुक्त (प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**